अति.महापालिका आयुक्त (ज) कार्यालय,
आस्थापना विभाग, पुणे मनपा.
जा.क्र. :-अतिमआ/साप्रवि/आस्था/ २८५५
दिनांक :- २५/०६/२०२१

**-: कार्यालयीन आदेश :-**

विषय :- पुणे महानगरपालिकेकडील कर आकारणी व कर संकलन विभागास अंदाजपत्रकातील दिलेली उद्दिष्टे व त्यानुषंगाने लेखनिकी संवर्गातील वरिष्ठ लिपिक व लिपिक टंकलेखक हुद्यावरील सेवक उपलब्ध करून देणेबाबत.

संदर्भ :- १) आदेश क्र. अतिमआ/साप्रवि/आस्था/४४९९, दि. २८.०९.२०२०
२) आदेश क्र. अतिमआ/साप्रवि/आस्था/४८४६, दि. १२.१०.२०२०

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील लेखनिकी संवर्गातील वरिष्ठ लिपिक व लिपिक टंकलेखक हुद्द्यावरील सेवकांची कर आकारणी व कर संकलन विभागाकडे महसूल वाढीच्या दृष्टीने प्रशासकीय कामकाजाच्या सोयीसाठी कामाच्या अंतर्गत व्यवस्थेसाठी उपरोक्त संदर्भ क्र. १ व २ चे आदेशान्वये नियुक्ती करण्यात आली होती.

संदर्भ क्र. १ व २ चे आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचे आदेश क्र.अतिमआ/साप्रवि/आस्था/२४५८, दि. २१.०६.२०२१ या आदेशान्वये रद्द करण्यात आलेले आहेत.

तथापि, संदर्भ क्र. १ अन्वये नियुक्त करण्यात आलेले स्थानिक संस्था कर विभागाकडील सेवकांचे कर आकारणी व कर संकलन विभागाकडील आदेश कायम ठेवण्यात येत आहेत. याची नोंद घेऊन त्याप्रमाणे कामकाज चालू ठेवावे.

तरी संबंधीत खातेप्रमुख / विभाग प्रमुख यांनी पुढील योग्य ती तजवीज करावी.

**(रुबल अग्रवाल)**
**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)**
**पुणे महानगरपालिका**

प्रत /-संबंधीत मा. खातेप्रमुख/प्रशासन अधिकारी, पुणे महानगरपालिका
यांजकडेस माहिती व पुढील तजवीजीसाठी रवाना...